# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०८.०६.२०२३ (गुरूवार)

---

## गळफास घेवुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— अंतर्गत मौजा खोकर्ला. येथे मृतक नामे— निळकंठ विश्वनाथ देशमुख वय ४१ वर्ष रा. खोकर्ला ता कुही याची शेती ही खोकर्ला शिवारात असुन, त्या शेतीवर आपला व आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करीत होते. त्या शेतीवर मृतकाने बॅकेकडुन कर्ज घेतले होते, परंतु शेतात नेहमी नापिकी होत असल्याने कर्जाची परतफेड करू शकले नाही. त्यामुळे मृतक नेहमी टेन्शन मध्ये राहत होते. दिनांक ०७/०६/२३ चे १७/०० ते १७/३० वा दरम्यान, यातील मृतक याने आपले शेतातील झोपडीमध्ये नॉयलान दोरीच्या साहायाने गळफास लावून आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— गुणवंत विश्वनाथ देशमुख वय ३८ वर्ष खोकर्ला ता कुही यांचे तोंडी रिपोर्टवरून पोस्टे वेलतुर येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास — पोंना /मनिराम भुरे मो न ९२८४१२२९०५ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**